MHKO100015652023

**नियमीत दिवाणी दावा क्र.२८०/२०२३**

रामदास वाईंगडे.
//वि//
महादेव सावंत वगैरे.

**निशाणी क्र.१५ वर आदेश**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ते ५ व ७ यांनी त्यांचेविरुध्द झालेला "विना कैफियत" चा आदेश रद्द करुन कैफियत दाखल करण्याची परवानगी मिळणेकरीता दाखल केलेला आहे. वादीतर्फे प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल केले. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

०२. प्रकरणाचे अवलोकन केले. वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांना समन्सची बजावणी झालेली आहे. परंतु, त्यांनी मुदतीत कैफियत दाखल केलेली नाही. प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता, प्रतिवादी क्र.१ ते ४ व ७ यांना दिनांक २३/०१/२०२४ रोजी समन्सची बजावणी झाली. त्यानंतर, दिनांक ३१/०१/२०२४ रोजी प्रतिवादी क्र.१ ते ५ व ७ त्यांच्या वकीलांमार्फत हजर झाले. परंतु, मुदतीत त्यांनी कैफियत दाखल केली नाही. नजरचुकीने दिनांक २५/०४/२०२४ रोजी प्रतिवादी क्र.१ ते ५ व ७ विरुध्द कैफियत आदेश पारीत करण्याचे राहिले. परंतु, रोजनामामध्ये त्यांच्याविरुध्द तसा आदेश पारीत केल्याचे नमुद केल्यामुळे त्यांचेतर्फे वकीलांनी प्रस्तुतचा अर्ज दिनांक १३/०८/२०२४ रोजी दाखल केलेला आहे.

०३. प्रस्तुत अर्जात प्रतिवादी यांनी असे कारण नमुद केलेले आहे की, प्रतिवादी हे कामासाठी बाहेर राहत असतात. त्यांचे येणे-जाणे होत नाही व वकील आजारी असुन त्यांचेवर ३ वेळा शस्त्रक्रिया झाली आहे. त्यांचे वकील दिनांक ०१/०२/२०२४ पासुन न्यायालयात आले नाहीत. तसेच, दावा मिळकतीबाबतचे जुने ग्रामपंचायत दप्तर उपलब्ध झाले नाही. तसेच, त्यांना सिटीसर्व्हे बाबत कागदपत्रे आणि खरेदीपत्र व यापूर्वीची माहिती देखील प्राप्त झाली नाही. प्रस्तुत अर्जात प्रतिवादी यांनी दिलेले कारण संयुक्तीक नाही. परंतु, प्रस्तुत प्रकरणाचे स्वरुप पाहता त्यांचे प्रस्तुत दाव्याकामी म्हणणे आणि कैफियत अभिलेखावर येणे दाव्याच्या गुणदोषावर निकालासाठी आवश्यक आहे. सबब, नैसर्गिक न्यायतत्वाचा विचार करता प्रतिवादी क्र.१ ते ५ व ७ यांचा प्रस्तुतचा अर्ज त्यांच्यावर

प्रत्येकी रक्कम रु.२००/- अशी एकुण रक्कम रु.१,२००/- खर्च लावून मंजुर करणे योग्य होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**-: आदेश :-**

०१. अर्ज रक्कम रु.१,२००/- (रुपये एक हजार दोनशे फक्त) च्या खर्चासह मंजुर करण्यात येतो.

०२. खर्चाची रक्कम प्रतिवादी क्र.१ ते ५ व ७ यांनी पुढील तारखेपर्यंत वादी यांना अदा करावी.

०३. खर्चाची रक्कम वादी यांना दिल्यानंतर प्रतिवादी क्र.१ ते ५ व ७ यांना त्यांची कैफियत सादर करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

(खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by SACHIN DURGASHANKAR MEHTA
Date: 2025.06.25 17:38:01 +0530

**( एस. डी. मेहता )**
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
गडहिंग्लज.

गडहिंग्लज.
दिनांकः २५/०६/२०२५.

:: **CERTIFICATE** ::

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | R. D. Patil. |
| Name of Court | S. D. Mehta,<br>Jt. CJJD & JMFC, Gadhinglaj. |
| Date of Dictation | 25/06/2025 |
| Order signed by P.O. on | 25/06/2025 |
| Order uploaded on | 25/06/2025 |